# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

सोमवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी येथे 'मराठी भाषेतील फिल्मबाजार पोर्टल'समितीची बैठक महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तथा समितीचे अध्यक्ष डॉ.अविनाश ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी समितीतील सदस्य श्री. स्वप्नील जोशी, श्री.संदिप घुगे, श्री. केतन मारू, श्री.संजय जाधव उपस्थित होते. दरम्यान मराठी भाषा दिन आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवीश्रेष्ठ वि.वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

मराठी भाषेतील चित्रपट, दूरचित्रवाणी, ओटीटी आदि क्षेत्राच्या विकासासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने फिल्मबाजार पोर्टल लवकरात लवकर विकसित केले जाणार आहे. जेणेकरून मराठीतील पटकथा लेखक, निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ,आदी घटकांना एकाच व्यासपीठावर आणणे सुलभ होईल. परिणामी मराठी मनोरंजन क्षेत्राला भक्कम पाठबळ मिळेल आणि मराठी मनोरंजन विश्व समृद्ध होईल. शिवाय जागतिक मनोरंजन क्षेत्राशी दर्जेदार स्पर्धा करेल. असा विश्वास आणि विचार समितीने व्यक्त केला.



# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org




